## निशाणी क्र.१११ खालील आदेश

प्रतिदाव्यातील वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज वादी नाथा सोपान निकम यांचे वारस अभिलेखावर आणणेस झालेला विलंब माफ होणेसाठी दाखल केलेला आहे.

(२) प्रतिदाव्यातील वादी यांचे असे कथन आहे की, वादी नाथा सोपान निकम हे दि.२९.०७.२०२४ रोजी मयत झाले आहेत. प्रतिदाव्यातील वादी हे कायमपणे चिंचणी येथे राहणेस असून त्यांना कायदयाचे फारसे ज्ञान नाही. तसेच सदर दाव्या संदर्भात त्यांना माहिती नसलेकारणाने त्यांनी रेकॉर्ड पाहिले नसले कारणाने त्यांना दाव्याची माहिती नव्हती. तसेच वडीलांच्या निधनाने त्यांचे मनावरती मोठा आघात झाला होता, त्यामुळे त्यांनी वेळेत कागदपत्रे पाहिली नव्हती. सदर मयत प्रतिदाव्यातील वादी यांचे वारसांची नावे सदर दावेकामी मुदतीत रेकॉर्डवर घेणे आवश्यक असतानाही अपुऱ्या माहितीमुळे प्रतिदाव्यातील वादी यांना कोर्टात हजर राहून मयत वारसांबाबत तजवीज करणे शक्य झाले नाही. त्यामुळे प्रतिदाव्यातील वादीचे वारस रेकॉर्डवर घेता आले नाहीत. सदर प्रतिदाव्यातील वादीचे वारस रेकॉर्डवर घेणेसाठी सर्व साधारण आठ महिन्यांचा विलंब झालेला असून सदर प्रतिदाव्यातील वादी यांचे विरुध्दचा अर्ज कायदयाने अबेट झालेला आहे. सदरचा आदेश रद्द होऊन मयत प्रतिदाव्यातील वादी यांचे वारस रेकॉर्डवर घेणे जरुरीचे आहे. त्यामुळे प्रतिदाव्यातील वादी यांचे वारसांना दाव्याचे कामी सामील करणेकरीता झालेला आठ महिन्यांचा विलंब माफ होऊन सदर वारसांची नावे रेकॉर्डवर घेणेस परवानगी मिळावी अशी विनंती केली आहे.

(३) प्रतिदाव्यातील प्रतिवादीतर्फे म्हणणे सादर करुन अर्जात कोणतेही योग्य कारण नमूद नसलेमुळे प्रतिदाव्यातील वादीचा अर्ज नामंजूर करणेची विनंती केली.

(४) प्रस्तुतचा निशाणी क्र.१११ कडील अर्ज, त्यावरील म्हणणे व त्या

पुष्ठ्यर्थ दाखल केलेले प्रतिज्ञापत्र यांचे अवलोकन केले. प्रतिदाव्यातील वादी व प्रतिवादीतर्फे विद्वान विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला. प्रतिदाव्यातील वादी यांनी प्रस्तुत अर्जान्वये वादी क्र.१ नाथा सोपान निकम यांचे वारस अभिलेखावर घेणेबाबत झालेला आठ महिन्यांचा विलंब माफ होवून मिळणेबाबत विनंती केलेली आहे. सदर प्रतिदाव्यातील वादी क्र.१ मयत झालेबाबत प्रतिवादी यांचा कोणताही आक्षेप दिसून येत नाही. दाव्याचे स्वरुप पाहता प्रतिदाव्यातील वादी यांनी विलंबाने प्रस्तुतचा अर्ज दाखल केला केवळ या कारणास्तव अर्ज नामंजूर करणे न्यायोचित होणार नाही. दाव्याचा गुणदोषांवर निपटारा होणेकरिता तसेच फलित व परिणामकारक हुकूमनामा होणेकरिता प्रस्तुतचा अर्ज मंजूर करणे न्यायोचित ठरते. तरी दाव्याचे स्वरुप विचारात घेता प्रस्तुतचा अर्ज मंजूर करणे न्यायोचित ठरते. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे;

## **आदेश**

प्रतिदाव्यातील वादी यांचा निशाणी क्र.१११ कडील अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

VAISHALI DIGAMBARRAO SHIRSE

Digitally signed by VAISHALI DIGAMBARRAO SHIRSE
Date: 2025.11.12 11:33:34 +0530

विटा. (श्रीमती.व्ही.डी.शिरसे)

दिनांकः- १०.११.२०२५. सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, विटा,

ता.खानापूर, जि.सांगली.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this PDF file are same as per the original.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | G.U.Varude, |
| Name of the Court | :- | Smt.V. D.Shirse<br>Jt.Civil Judge Jr. Dn., & J.M.F.C.,<br>Vita. Tal:-Khanapur. |
| Date of decision | :- | 10.11.2025 |
| Order signed by P.O. on | :- | 10.11.2025 |
| Order uploaded on | :- | 12.11.2025 |